जिल्हाधिकारी, रत्नागिरी

महाराष्ट्र राज्य सेवा [वैद्यकीय देखभाल] नियम १९६१ व त्या नियमामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणेनुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती देयके ....

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन परिपत्रक, क्र. एमएजी-१०९५/सीआर-३१/९५/आरोग्य-७,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक :- ८ ऑगस्ट १९९५

परिपत्रक :-

महाराष्ट्र राज्य [वैद्यकीय देखभाल] नियम हे मूलत: महाराष्ट्र राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू आहेत. तथापि काही मंत्रालयीन विभागांनी हे नियम त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली असलेल्या जिल्हा परिषद कर्मचारी, विद्यापीठे व संलग्न महाविद्यालये यातील कर्मचारी, मान्यताप्राप्त खाजगी माध्यमिक शाळातील पूर्णवेळ कर्मचारी, कृषी विद्यापीठातील कर्मचारी यासारख्या स्थानिक संस्था, शासकीय उपक्रम, स्वायत्त मंडळे यामधील कर्मचाऱ्यांनाही लागू केलेले असल्याने शासनाने ज्या २३ आजारासाठी तातडीच्या उपचारासाठी खाजगी रुग्णालयात घेतलेल्या उपचारावरील होणारा खर्च प्रतिपूर्तीसाठी विहित मर्यादेच्या अधिन राहून अनुज्ञेय ठरविलेला आहे तो मिळण्यास ते पात्र आहेत. तसेच हृदय उप-मार्ग शस्त्रक्रिया, हृदय शस्त्रक्रिया, व रक्ताचा कर्करोग, मूत्रपिंडरोपण वगैरे ठराविक आजारासाठी होणारा पूर्ण खर्च शासनाने मान्यता दिलेल्या रुग्णालयात उपचार घेतल्यास अनुज्ञेय आहे.

वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके, संबंधित प्राधिकृत अधिकाऱ्यांना प्रदान केलेल्या शक्तीच्या अधीन राहून त्यांनी त्यांच्या स्तरावर निकाली काढावी व केवळ ज्या ठिकाणी नियमांची तरतूद सकृतदर्शनी स्पष्ट नाही किंवा अधिक स्पष्टीकरणाची/सल्ल्याची आवश्यकता आहे किंवा अपवादात्मक प्रसंगी काही खास कारणास्तव काही प्रतिपूर्तीची देयके खास बाब म्हणून मंजूर करणे आवश्यक आहे अशी प्रकरणे या विभागाला त्यासाठी ठोस समर्थनासह दाखवावी अशी अपेक्षा आहे. तथापि प्रशासकीय विभागास वारंवार सूचना देऊनही वैद्यकीय प्रतिपूर्तीची प्रकरणे विहित नियम व वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार सखोल छाननी न करता या विभागाकडे सरसकटपणे पाठविली जातात. अशी प्रकरणे प्रशासकीय विभागाच्या किंवा वित्त विभागाच्या मान्यतेसाठी पाठविण्यापूर्वी त्यांची महाराष्ट्र राज्य सेवा [वैद्यकीय देखभाल] नियम १९६१ मधील नियम व या विभागाने या संबंधात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सखोल छाननी करून पाठविणे आवश्यक आहे. तसेच त्यामध्ये विहित केलेल्या बाबींची पूर्तता करूनच स्वयंस्पष्ट प्रस्ताव पाठविणे आवश्यक आहे. त्यामुळे या विभागाला आवश्यक तो सल्ला किंवा सहमती देण्याचा निर्णय घेणे सुलभ होईल.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
21 AUG 1995

तसेच ब-याच वेळा या विभागाकडे स्थायी आदेशान्वये अनुज्ञेय नसलेली काही प्रकरणे विशेष बाब म्हणून मंजूर करण्यासाठी येतात. काही बाबतीत ही प्रकरणे वित्त विभागाच्या सहमतीने खास बाब म्हणून मंजूर करण्यासाठी पाठविण्यात येतात. परंतु या खास बाबी एक तर आर्थिक मर्यादेची शिथिलता किंवा शासनाने विहित केलेल्या २३ आजाराव्यतिरिक्त आजाराची आकस्मिकता याच्या संदर्भात असते. अपवादात्मक प्रसंगी अशा खास बाबींना या विभागाकडून वित्त विभागाच्या सहमतीने मान्यता दिली जाते. तथापि एखादी खास बाब म्हणून मंजूर केली याचा अर्थ संदर्भाधीन देयक मंजूर करुन घेण्यासाठी ज्या बाबींचा अवलंब करावा लागतो किंवा कागदपत्रांची पूर्तता करावी लागते ती न करण्यास सहमती दिली आहे असा होत नाही. यासाठी आवश्यक त्या सर्व प्रक्रिया उदा. बिलांची नियमानुसार तपासणी, कागदपत्रांची पूर्तता, अनुज्ञेय रकमेची परिगणना, औषधे व इतर बाबींची अनुज्ञेयता वगैरे करणे आवश्यक आहे.

प्रशासकीय विभागास याद्वारे विशेष सूचना देण्यात येते की, वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीची देयके या विभागात सहमती, मंजूरी किंवा संदर्भासाठी सादर करताना कर्मचा-यांनी देयकासोबत शासनाने विहित केलेली आवश्यक ती कागदपत्रे व प्रपत्रे [अ, ब, क व ड प्रपत्रे] सोबत पाठविली आहेत किंवा नाहीत याची खात्री करुन घ्यावी. प्रशासकीय विभागांस अशीही विनंती करण्यात येते की, त्यांनी आवश्यकता वाटल्यास या सूचना त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालय प्रमुखांना किंवा स्थानिक संस्था मंडळे, सांविधानिक मंडळे इत्यादिंना द्याव्यात. तसेच परिच्छेद १ मध्ये नमूद केलेल्या आजाराच्या संदर्भात त्यांनी या विभागाच्या/वित्त विभागाच्या सहमतीने विशेष बाबी म्हणून मंजूर केलेल्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या प्रकरणातील आदेशांची प्रत या विभागास या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक व दिनांक नमूद करून माहितीसाठी अग्रेषित करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[रा. गो. बर्डे]
महाराष्ट्र शासनाचे उपसचिव.

प्रति,

सचिव, राज्यपाल, महाराष्ट्र.
मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव.
उप मुख्यमंत्र्यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक.